| न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जत, जि. सांगली यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले) | |
|---|---|
| MHSN080002702021 | दाखल तारीख :- २२.०२.२०२१<br>नोंदणी तारीख :- ०२.०३.२०२१<br>निकाल तारीख :- १७.०७.२०२६<br>कालावधी : ०५ वर्ष ०४ महिने २३ दिवस |

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५३/२०२१** **निशाणी क्र.**

१. **सिंधु नवनाथ सावंत,** ]
वय ३० वर्षे, व्यवसाय – घरकाम, ]
२. **सार्थक नवनाथ सावंत,** ]
वय १० वर्षे, व्यवसाय – घरकाम, ]
३. **समर्थ नवनाथ सावंत,** ]
वय १० वर्षे, व्यवसाय – घरकाम, ]
४. **समिक्षा नवनाथ सावंत,** ]
वय ०७ वर्षे, व्यवसाय – घरकाम, ]
द्वारा महादेव धोंडीराम शिंदे, ]
रा. जि.प.प्रा. शाळेमागे, अंतराळ, ]
ता. जत, जि. सांगली. ] .... **अर्जदार**

**विरुध्द**

१. **नवनाथ नारायण सावंत,** ]
वय ४२ वर्षे, व्यवसाय– नोकरी, ]
२. **सजाबाई नारायण सावंत,** ]
वय ६० वर्षे, व्यवसाय– घरकाम, ]

३. **वैभव विलास अनुसे,** ]
वय २५ वर्षे, व्यवसाय–चालक, ] .... **जाबदार**

---

**अर्ज – कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १८, १९, २०,२१ व २२ अन्वये.**

---

| | | |
|---|---|---|
| अर्जदारतर्फे विधीज्ञ | – | श्री. आय. ओ. हादीमणी |
| जाबदार क्र.१ व २ तर्फे विधीज्ञ | – | श्री. व्ही. एस. देसाई |
| जाबदार क्र.३ विरुध्द | – | एकतर्फा. |

---

**न्यायनिर्णय**

**( दिनांक १७.०७.२०२६ रोजी पारीत)**

अर्जदार यांनी प्रस्तूत अर्जाव्दारे कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी पोटगी, निवासी आदेश अथवा दरमहा घरभाडे, संरक्षण आदेश व मुलांचा ताबा अर्जदार यांचेकडेच रहावा इत्यादी बाबींची मागणी केली आहे.

२. जाबदार यांचेकडून होत असलेल्या त्रासाबाबत तसेच छळाबाबत संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, महिला व बाल विकास विभाग अंतर्गत, जत यांना अर्जदार यांनी अर्ज दिला असून संरक्षण अधिकारी यांचेकडून सादर करणेत आलेल्या कौटुंबिक घटना अहवालाच्या अनुषंगाने अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे –

३. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ०९.०५.२००७ रोजी

संपन्न झाला. त्यानंतर ३ महिन्यांनी जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास त्रास देणेस सुरुवात केली. दिनांक १८.०९.२०११ रोजी उभयतांना सार्थक व समर्थ अशी दोन जुळी मुले झाली तर दिनांक १४.०३.२०१३ रोजी समिक्षा नावाची मुलगी जन्मास आली. जाबदार क्र.१ यांच्या वागणुकीत सुधारणा होईल असे वाटत होते. तथापी, त्यामध्ये काहीही बदल झाला नाही. जाबदार क्र.१ हे आर्थिक स्वरुपात काहीही मदत करीत नसल्यामुळे अर्जदार यांनी घरगुती जेवणाचे डबे देण्यास सुरुवात केली. अर्जदार यांच्या गावाकडील लोक डबे नेण्यासाठी येत होते. परंतु, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांचेवर संशय घेण्यास सुरुवात केली. अर्जदार व त्यांच्या मुलांना उपाशी ठेवणे, टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, असभ्य बोलणे या प्रकारचा जाबदार क्र.१ व २ यांनी त्रास देणेस सुरुवात केली. त्याचबरोबर जाबदार क्र.१ हे अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेवून त्यांना घराच्या बाहेर जाण्यास मनाई करत होते व इतर लोकांबरोबर बोलण्यास विरोध करत होते. तिन्ही मुलांच्या पोलनपोषणाकरिता तसेच शिक्षणाकरिता जाबदार क्र.१ हे पैसे देत नव्हते. मेसमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर अर्जदार हे सर्व खर्च करत होते. जाबदार क्र.१ हे अर्जदार व त्यांचे मुलांना जीवे मारणेची वारंवार धमकी देत होते. अशाप्रकारे जाबदार हे १२ ते १३ वर्षापासून अर्जदार यांचा छळ करत होते.

४. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले की, समिक्षाच्या दवाखान्याकरिता जाबदार यांनी कोणताही खर्च उचलला नाही. अर्जदार यांनी त्यांच्या आईकडून पैसे घेवून दवाखान्याचा खर्च भागविला. त्याचबरोबर जाबदार क्र.१ यांनी हिराई हॉस्पीटल, जत येथे त्याचे मुलावर झालेल्या टॉन्सीलच्या शस्त्रक्रियेचा खर्च देखील केला नाही. दवाखान्यात येणे करिता केवळ एकच वाहन उपलब्ध असल्यामुळे परत जाण्याकरिता काहीच मिळत नव्हते. त्यामुळे, एखादया कोणाच्या वाहनावरुन गेले तर, जाबदार क्र.१ हे अर्जदार यांचेवर संशय घेत होते. दिनांक १३.११.२०२० रोजी दुपारी जाबदार क्र.१ व ३ यांनी अर्जदार यांचे माहेरचे घरासमोर अर्जदार यांना बेशुध्द होण्याइतपत मारहाण

केली. अर्जदार यांचा मोठा भाउ सुखदेव महादेव शिंदे यांच्या सांगण्यावरुन दिनांक १५.११.२०२० रोजी जाबदार विरुध्द जत पोलीस ठाणेत तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन जाबदार यांचे विरुध्द भा.द.वि.कलम ३२३, ३२४, ५०४ सह कलम ३४ अन्वये नियमित फौजदारी खटला क्र.५२/२०२१ नोंद करणेत आलेला असून तो सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सन २०२० पासून आजपावेतो जाबदार क्र.१ व २ यांनी विनाकारण मानसिक व शारिरीक त्रास देवून अर्जदार व त्यांचे मुलांना घरातून हाकलून दिले आहे. त्यानंतर अर्जदार व त्यांची तिन्ही मुले माहेरी अश्रीताचे जीवन जगत आहेत. त्यांच्या पोटापाण्याची अथवा शिक्षणाची जाबदार क्र.१ यांनी कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

**५.** अर्जदार यांच्या कथनानुसार, जाबदार यांच्या घरची परिस्थिती अत्यंत चांगली आहे. जाबदार क्र.१ हे भांडूप येथे कॅन्टीनमध्ये कामास असून त्यांना दरमहा रुपये १०,०००/– पगार मिळतो. टिटवाळा येथे बांधीव घर असून त्यापासून जाबदार क्र.१ यांना रुपये ५,०००/– भाडे येते. अंतराळ येथे जाबदार क्र.१ यांच्या वडीलांच्या नावे जमीन गट क्र.६०२ आहे. सदर जमिनीतून जाबदार हे केळी, भाजीपाला, द्राक्षे, उस इत्यादी पिके घेतात. तसेच जाबदारांच्या २ म्हैशी, १ देशी गाय व ५ शेळया आहेत. या सर्व बाबीपासून जाबदार यांना रुपये ५ ते ६ लाख उत्पन्न मिळते. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांची पोटगी देण्याची ऐपत आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी त्यांना व त्यांचे मुलांना जाबदार क्र.१ ते ३ यांचेपासून संरक्षणाचा आदेश मिळणेची, निवाऱ्याकरिता घराचा ताबा किंवा घरभाडे पोटी दरमहा रुपये ३,०००/– मिळण्याची, उदरनिर्वाहाकरिता प्रत्येकी रुपये ४,०००/– मिळणेची, वैदयकीय खर्चापोटी रुपये ३०,०००/– तसेच शाळेची फी व त्याचेशी संबंधित खर्चापोटी दरमहा रुपये २,०००/– मिळण्याची विनंती केली आहे.

**<u>जाबदार यांचे म्हणणे</u> –**

६. जाबदार क्र.३ यांना प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळुन देखील ते हजर झाले नाहीत. त्यामुळे, सदरचे प्रकरण त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले. जाबदार क्र.१ व २ हे त्यांच्या विधीज्ञामार्फत हजर झाले. त्यांनी त्यांचे म्हणणे नि.१७ कडे दाखल केलेले आहे. जाबदार क्र.१ व २ यांनी अर्जदार यांच्या अर्जातील सर्व कथने अमान्य केली आहेत. जाबदार क्र.१ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार ही त्यांची पत्नी असून उभयतांना तीन आपत्ये असल्याबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. जाबदार क्र.१ व २ यांच्या कथनानुसार, अर्जदार ही त्यांचेकडे कधीही व्यवस्थित नांदली नाही. जाबदार यांना न सांगता अर्जदार ही त्यांच्या मित्रासोबत निघून जात होती व त्यांना समजावून सांगून पुन्हा नांदावयास घेवून यावे लागत होते. अर्जदार यांच्या इच्छेमुळे जाबदार क्र.१ आपल्या कुटुंबाला सोडून अर्जदार यांचेबरोबर वेगळे रहात होते. अशी परिस्थिती असताना देखील अर्जदार ही जाबदार यांचेशी निष्कारण वाद घालून, शिवीगाळ करुन जाबदार क्र.३ यांचे सोबत जवळ जवळ १५ दिवस रहात होती. अर्जदार या जाबदार क्र.३ यांचे सोबत विवाहबाहय अनैतिक संबंध ठेवून रहात होत्या. अर्जदार यांच्या माहेरची परिस्थिती अत्यंत सधन असल्यामुळे जाबदार यांच्या घरातील सर्व सोने, दागिणे घेवून स्वतःहून माहेरी रहात आहे.

७. जाबदार यांनी असा आक्षेप घेतला आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा निम्न दिवाणी व निम्न फौजदारी या स्वरुपामध्ये मोडत असल्यामुळे त्यास दिवाणी प्रक्रिया संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता मधील तरतुदी लागू होतात. त्यामुळे, सदर अर्जास सिव्हील मॅन्युअल परिच्छेद ८डी–१२ ची बाधा येते. तसेच अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये मुदतीबाबत कोणताही उल्लेख केलेला दिसून येत नाही. त्यामुळे, सदर अर्ज हा मुदतीच्या कायदयातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही. तसेच अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये अधिकार क्षेत्राबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे, सदर

अर्जास सिव्हील मॅन्युअल परिच्छेद ८डी–१३ ची बाधा येते. त्याचबरोबर अर्जदार यांनी त्यांचे अर्जास कारण केंव्हा घडले याबाबत काहीही नमूद केलेले नाही. याही कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ७ नियम १ई अन्वये फेळाटणेची विनंती केली आहे. प्रस्तुत कामातील अर्जदार क्र.२ ते ४ हे अज्ञान आहेत. तथापी, त्यांचे अ.पा.क. नेमणुकीकरिता स्वतंत्र अर्ज व प्रतिज्ञापत्र या कामी सादर करण्यात आलेले नाही. याही कारणास्तव अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

८. जाबदार क्र.१ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, उभयतांच्या विवाहानंतर काही दिवसच अर्जदार या जाबदार क्र.१ यांच्यासोबत व्यवस्थित राहिल्या. त्यानंतर काहीतरी कारण सांगून माहेरी निघून जात होत्या व तीन चार महिने झाले तरी जाबदार यांचेकडे येत नव्हत्या. मध्यस्थांना सोबत घेवून स्वतंत्र भाडयाची गाडी करुन अर्जदार यांना समजावून सांगून घेवून यावे लागत होते. भ्रमणध्वनीद्वारे फोन करुन, प्रत्यक्षा समजावून सांगून अर्जदार या जाबदार यांचेकडे नांदावयास आलेल्या नाहीत. त्यांनी जाबदार क्र.१ यांचा स्वतःहून त्याग केलेला आहे. जाबदार यांनी अर्जदार यांचा कोणताही शारिरीक, मानसिक अथवा आर्थिक छळ केलेला नाही.

९. जाबदार यांच्या कथनानुसार, जाबदार क्र.३ हे जाबदार क्र.१ यांचे घरी मेसमध्ये जेवण करणेकरिता येत होते. त्यानंतर मात्र ते वारंवार जाबदार क्र.१ यांचे घरी येवू लागले. अर्जदारास त्याबाबत विचारणा केली असता, जाबदार क्र.३ हा मानलेला भाउ आहे असे सांगण्यात आले. उभयतांमधील वादामुळे जाबदार क्र.१ यांना अर्जदार व जाबदार क्र.३ यांचेमधील अनैतिक संबंधाबाबत समजून आले. त्याबाबत विचारणा केली असता, अर्जदार व जाबदार क्र.३ यांनी जाबदार क्र.१ यांना जीवे मारण्याची धमकी दिली. स्वतःच्या व मुलांच्या अंगावरील सोने व प्रतिमाह येणारी मेसची रक्कम अर्जदार ही जाबदार क्र.३ यांना देत होती. त्यामुळे अर्जदार व जाबदार क्र.१ यांचेमध्ये

वाद निर्माण होत असे. जाबदार क्र.३ व अर्जदार असे मिळून जाबदार क्र.१ यांना मारहाण करत होते. अर्जदार क्र.१ या ज्यावेळेस माहेरी राहणेस आल्या तेंव्हा त्यांचे जत येथील मेडीकल चालविणाऱ्या एका इसमाशी विवाहबाहय संबंध निर्माण झाले. सदरची बाब ही जाबदार क्र.३ यांना ते वारंवार अर्जदार यांच्या माहेरी जात असल्यामुळे समजली. त्यामुळे, जाबदार क्र.३ यांनी अर्जदार यांना मारहाण केली. त्यावेळी जाबदार क्र.१ हे मुंबई येथे होते. केवळ जाबदार क्र.३ यांचे विरुध्द तक्रार दिल्यास त्यांच्या मधील असलेले संबंध उघडकीस येतील आणि म्हणून जाबदार क्र.३ यांचे सोबत जाबदार क्र.१ यांना देखील प्रस्तूत कामी गोवविण्यात आलेले आहे. त्यामुळे, अर्जदार यांचा अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

**१०.** अर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. आय. ओ. हादिमणी यांचा युक्तिवाद ऐकला. जाबदारतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. देसाई यांनी त्यांचे कथनांचे पृष्ठयर्थ लेखी युक्तिवाद सादर केलेला आहे. लेखी व मौखिक पुराव्याचे अवलोकन केले.

**<u>अर्जदार यांचा पुरावा</u>**

**११.** अर्जदारांनी आपले म्हणणे शाबीत करण्यासाठी प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार म्हणुन अर्जदार क्र.१ यांनी स्वतःचा पुरावा नि.क्र.१५ वर दाखल केला आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांचे कथनाचे पृष्ठयर्थ साक्षीदार आक्काताई महादेव शिंदे यांना नि.२२ कडे तपासले असून खालील कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली आहे.

| अ.क्र. | दस्तऐवजाचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | महिला संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, जत यांना दिलेल्या अर्जाची प्रत | ३/१ |
| २. | उभयतांच्या विवाहाचे फोटो | ३/२ |

| | | |
|---|---|---|
| ३. | उभयतांच्या लग्नाची पत्रीका | ३/३ |
| ४. | एफ.आय.आर. ची प्रत | ३/८ |
| ५. | अर्जदार यांचे संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र | ६ |
| ६. | मौजे अंतराळ, ता. जत येथील गट क्र.८२ चा उतारा | १४/१ |
| ७. | मौजे अंतराळ, ता. जत येथील भूमापन क्र.६०२ चा सातबारा उतारा | १४/२ |

अर्जदाराने नि.क्र.४८ अन्वये त्यांचा पुरावा बंद केला आहे.

## जाबदार यांचा पुरावा–

**१२.** जाबदारांनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ जाबदार क्र.१ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.२९ कडे दाखल केलेले आहे. त्यांचे कथनाचे पृष्ठयर्थ त्यांनी आपली भिस्त खालील कागदपत्रावर ठेवली आहे.

| अ.क्र. | दस्तऐवजाचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | सुखदेव महादेव शिंदे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र | २४/१ |
| २. | शकुंतला शंकर भोसले यांचे मृत्युचे प्रमाणपत्र | २४/२ |
| ३. | महादेव धोंडीराम शिंदे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र | २४/३ |
| ४. | मौजे अंतराळ, ता. जत येथील खाते क्र.१३७ चा उतारा | २४/४ |

| | | |
|---|---|---|
| ५. | मौजे अंतराळ, ता. जत येथील गट क्र.१७ चा सातबारा उतारा | २४/५ |
| ६. | मौजे अंतराळ, ता. जत येथील गट क्र.१९, २३५, २३७, २३८, २३९, २९ चे सातबारा उतारे | २४/६ |

जाबदार क्र.१ व २ यांनी नि.३० अन्वये त्यांचा पुरावा बंद केला आहे.

## मुद्दे व निष्कर्ष–

**१३.** अभिलेखावरील पुरावा, दस्तऐवज व युक्तीवाद लक्षात घेता पुढील मुद्दे माझे विचाराधिन आले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढील प्रमाणे नमुद करीत आहे –

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार हे शाबीत करते काय की, लग्नानंतर जाबदारांनी तिच्या विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला ? | होय. |
| **२.** | अर्जदार या जाबदार यांच्याकडुन आर्थिक सहाय्यापोटी दरमहा पोटगी मिळविण्यास पात्र आहेत का? असल्यास किती ? | अंशतः होय, अर्जदार क्र.१ ते ४ यांना प्रत्येकी दरमहा रुपये १,०००/– |
| **३.** | अर्जदार या जाबदार यांच्याकडुन वैदयकीय खर्च, शाळेची फी व त्यासंबंधी खर्च मिळण्यास पात्र आहेत का ? असल्यास किती ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | अर्जदार या जाबदार यांच्याविरुध्द संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत का ? | होय. |
| ५. | अर्जदार या जाबदार यांच्याकडुन घरभाडे मिळण्यास पात्र आहे का ? | नाही. |
| ६. | अर्जदार क्र.२ ते ४ यांचा ताबा अर्जदार क्र.१ यांचेकडे ठेवणेबाबत त्या पात्र आहेत का ? | होय. |
| ७. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुद्दे क्र.१ करीता (कौंटुबिक हिंसाचार)

**१४.** कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम–२००५, कलम–३ अन्वये कौंटुबिक हिंसाचाराचा व्याख्या दिली आहे. त्यानुसार कौंटुबिक हिंसाचार म्हणजे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जाबदाराची कोणतीही कृती, वागणुक किंवा क्रिया वर्तवणुक जर –

**अ–** पिडीत व्यक्तीला हानी किंवा इजा पोहोचवेल किंवा तिच्या मानसीक किंवा शारिरिक आरोग्याला, सुरक्षेला, जिवणाला, अवयवांना किंवा कल्याणाला धोका पोहचवित असेल तर, आणि यामध्ये शारिरिक गैरवर्तणुक, लैगिंक गैरवर्तणूक, शाब्दीक किंवा भावनीक गैरवर्तणुक करण्याचाही समावेश असेल.

**ब–** पिडीत व्यक्तीला किंवा तिच्याशी नातेसंबध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणताही हुंडा किंवा इतर मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तुंची कोणतीही

बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्यासाठी जबरदस्ती करण्याच्या दृष्टीकोणातुन त्या पिडीत व्यक्तीला सतावतील, हानी किंवा इजा पोहचवतील किंवा तिला धोका पोहोचवतील. तसेच सदर व्याख्येमध्ये शारिरिक गैरवर्तणुक, लैंगिक गैरवर्तणुक, शाब्दीक आणि भावनिक गैरवर्तणुक आणि आर्थीक गैरवर्तणुक या बाबतीत स्पष्टीकरण करण्यात आले आहे. वरील व्याख्येस अनुसरुन जाबदाराने अर्जदाराचा कौंटुबिक हिंसाचार केला काय हे अभीलेखावरील पुराव्याच्या आधारे पाहणे गरजेचे आहे.

**१५.** कौंटुबिक हिंसाचाराबाबत अर्जदार यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.१५ वर दाखल केलेले आहे. सदरच्या शपथपत्रातील मजकुर हा त्यांच्या अर्जाची पुनरावृत्ती आहे. त्यांच्या पुराव्यानुसार अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ०९.०५.२००७ रोजी संपन्न झाला. त्यानंतर ३ महिन्यांनी जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास त्रास देणेस सुरुवात केली. दिनांक १८.०९.२०११ रोजी उभयतांना सार्थक व समर्थ अशी दोन जुळी मुले झाली तर दिनांक १४.०३.२०१३ रोजी समिक्षा नावाची मुलगी जन्मास आली. जाबदार क्र.१ यांच्या वागणुकीत सुधारणा होईल असे वाटत होते. तथापी, त्यामध्ये काहीही बदल झाला नाही. जाबदार क्र.१ हे आर्थिक स्वरुपात काहीही मदत करीत नसल्यामुळे अर्जदार यांनी घरगुती जेवणाचे डबे देण्यास सुरुवात केली. अर्जदार यांच्या गावाकडील लोक डबे नेण्यासाठी येत होते. परंतु, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांचेवर संशय घेण्यास सुरुवात केली. अर्जदार व त्यांच्या मुलांना उपाशी ठेवणे, टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, असभ्य बोलणे याप्रकारचा जाबदार क्र.१ व २ यांनी त्रास देणेस सुरुवात केली. त्याचबरोबर जाबदार क्र.१ हे अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेवून त्यांना घराच्या बाहेर जाण्यास मनाई करत होते व इतर लोकांबरोबर बोलण्यास विरोध करत होते. दिनांक १३.११.२०२० रोजी दुपारी जाबदार क्र.१ व ३ यांनी अर्जदार यांचे माहेरचे घरासमोर अर्जदार यांना बेशुध्द होण्याइतपत मारहाण केली.

**१६.** अर्जदारतर्फे सा.क्र.२ आक्काताई यांनी देखील अर्जदार यांच्या कथनांना दुजोरा दिलेला आहे. तसेच जाबदार क्र.१ यांच्याकडून होत असलेल्या मानसिक व शारिरीक त्रासाबाबत अर्जदार या त्यांना सर्व सांगत होत्या असे सदर साक्षीदाराने कथन केलेले आहे. जाबदार क्र.१ यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र सादर करुन त्यांनी अर्जदार यांचा कोणताही शारिरीक अथवा मानसिक छळ केला नसल्याचे कथन केलेले आहे. परंतु, त्याबाबतच्या सर्व प्रश्नांची अर्जदार यांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. परंतु, जाबदारतर्फे सदरची कथने खोडून काढण्यासाठी कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेत आलेला नाही.

**१७.** अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये पुढे हे कबूल केले आहे की, खानावळ सुरु असताना जाबदार क्र.३ वैभव विलास अनुसे यांचेसोबत अर्जदार यांची ओळख झाली. जाबदार क्र.३ हे त्यांच्या खानावळीचे ग्राहक असल्यामुळे ते अर्जदार यांचेकडे येत जात होते. जाबदार क्र.३ व त्यांच्यामध्ये अनैतिक संबंध आहेत असे जाबदार यांना वाटत होते आणि त्यामुळे, जाबदार क्र.१ व अर्जदार यांचेमध्ये वाद सुरू होत होते ही बाब त्यांनी मान्य केली आहे. तथापी, जाबदार क्र.३ यांचेसोबत अर्जदार यांचे काहीतरी संबंध होते व जाबदार क्र.३ हे अर्जदार यांना अंतराळ गावी येवून त्रास देत होते आणि त्यामुळे, जाबदार क्र.३ यांना या कामी जाबदार म्हणून समाविष्ट केलेले आहे ही बाब अर्जदार यांनी नाकारलेली आहे. अर्जदार यांची मुलगी आजारी होती त्यामुळे तिला डॉ. वाघ यांच्या दवाखान्यात उपचाराकरिता ५ दिवस दाखल करण्यात आले होते, त्यामुळे अर्जदार व जाबदार क्र.१ हे दवाखान्यात रहात होते, त्यावेळी जानकी मेडकल येथे काम करणारा बाळु मालगत्ते याचेशी त्यांची ओळख झाली तसेच त्यांची मुले आजारी पडल्यानंतर त्या फोन करुन बाळुचा सल्ला व औषध घेत होत्या या बाबी अर्जदार यांनी कबूल केलेल्या आहेत. जाबदार क्र.१ हे मुंबईला रहावयास गेलेला असताना दरम्यानच्या काळात जाबदार क्र.३ हा अर्जदार यांच्या माहेरी येत असल्याची

बाब त्यांनी नाकारली आहे. तसेच अर्जदार यांचे जानकी मेडीकल येथील बाळु मालगत्ते याचे बरोबर अनैतिक संबंध असल्यामुळे जाबदार क्र.३ यांनी अर्जदार क्र.१ सोबत वाद केला होता. बाळु मालगत्ते व जाबदार क्र.३ यांचेशी अनैतिक संबंध असल्याची बाब अर्जदार यांनी स्पष्टपणे नाकारलेली आहे. जाबदार यांच्या विधीज्ञांनी घेतलेल्या उलटतपासातून अर्जदार यांचे जाबदार क्र.३ व अन्य एक इसम नामे बाळु मालगत्ते यांच्याशी अर्जदार यांचे अनैतिक संबंध असल्याचे दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापी, उलटतपासातील अर्जदार यांनी अनैतिक संबंधाच्या दृष्टीने परगमनासंबंधी नाकारलेली सूचक प्रश्ने विचारात घेता, जाबदार यांनी घेतलेला आक्षेप कायदयातील तरतुदीस अनुसरुन सिध्द करणे आवश्यक आहे. तथापी, परगमनासंबंधीचा आरोप सिध्द करण्याकरिता केवळ अभिकथन करणे पुरेसे नाही तर त्यासंबंधाने आवश्यक असणारा सबळ पुरावा अभिलेखावर आणणे अपेक्षित आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता जाबदारतर्फे तसा कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही.

१८. पुढे अर्जदार यांनी त्यांचेतर्फे साक्षीदार आक्काताई महादेव शिंदे यांना नि.२२ कडे तपासलेले आहे. अर्जदार ही प्रस्तुत साक्षीदाराची मुलगी असून त्यांनी अर्जदार यांच्या कथनाप्रमाणेच साक्ष दिली आहे. त्यामुळे, सदर कथनांची पुनरावृत्ती टाळणेकरिता या ठिकाणी साक्षीदाराच्या शपथपत्रातील कथनांचा उल्लेख करणेत आलेला नाही. जाबदारतर्फे वकीलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने ही बाब मान्य केली आहे की, अंतराळ येथे त्यांचे साडे चार एकर शेत असून घर देखील आहे. साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, जाबदार क्र.३ वैभव हा अर्जदार यांच्या मेसमध्ये जेवण करणेकरिता येत होता. जाबदार क्र.३ हे मेसमध्ये वारंवार येत होते आणि त्यामुळे, जाबदार क्र.१ हे अर्जदार यांच्यावर संशय घेत होते व त्यांच्यामध्ये वाद होत होते ही बाब साक्षीदाराने मान्य केलेली आहे. इतर सर्व सुचक प्रश्नांना साक्षीदाराने

नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

**१९.** जाबदार क्र.१ यांनी त्यांचे कथनाचे पृष्ठयर्थ स्वतःला नि.२९ कडे तपासलेले आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ त्यांचेतर्फे त्यांची आई आक्काताई यांना साक्षीदार म्हणून तपासलेले आहे. सदरचा साक्षीदार हा स्वारस्य साक्षीदार असल्यामुळे त्यांची साक्ष या ठिकाणी ग्राहय धरता येणार नाही. जाबदार क्र.१ यांच्या शपथपत्रातील कथने ही मूळ म्हणण्याची पुनरावृत्ती आहे. जाबदार क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये, उभयतांना अर्जदार क्र.२ ते ४ ही आपत्ये जन्माला आल्याची बाब मान्य केलेली आहे. अर्जदार यांना आर्थिक मदत केली नसल्याबाबतची सर्व सुचनात्मक प्रश्न जाबदार क्र.१ यांनी नाकारलेली आहेत. तसेच अर्जदार यांना त्यांनी व जाबदार क्र.३ यांनी छळ केल्याचे, जीवे मारण्याची धमकी दिल्याचे अमान्य केलेले आहे. तसेच अर्जदार व त्यांच्या मुलांना घराबाहेर काढल्यानंतर त्यांची पालनपोषणाची व कपडेलत्त्याची कोणतीही व्यवस्था केली नसल्याची बाब देखील नाकारलेली आहे.

**२०.** जाबदार क्र.१ व ३ यांनी अर्जदार यांना मारहाण केली हे सिध्द करणेकरिता अभिलेखावर अर्जदार यांनी दिलेली प्रथम खबर क्र.४५५/२०२० दिनांक १५.११.२०२० रोजीची प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीचे अवलोकन केले असता जाबदार क्र.१ व ३ यांनी अर्जदार यांना मारहाण केली म्हणून त्यांच्या विरुध्द भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अर्जदार क्र.१ यांनी प्रथम खबर दिल्याचे दिसून येते. त्यामुळे, जाबदार यांनी अर्जदार यांचा छळ केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दे क्र.२ करिता ( आर्थिक सहाय्या पोटी पोटगी )–**

**२१.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी जाबदार क्र.१ विरुध्द त्यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये ४,०००/– पोटगी मिळण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांच्या कथनानुसार, त्या अर्जदार क्र.२ ते ४ यांचेसह जत येथे राहणेस आहेत. अर्जदार यांच्या कथनानुसार, जाबदार यांच्या घरची परिस्थिती अत्यंत चांगली आहे. जाबदार क्र.१ हे भांडूप येथे कॅन्टीनमध्ये कामास असून त्यांना दरमहा रुपये १०,०००/– पगार मिळतो. टिटवाळा येथे बांधीव घर असून त्यापासून जाबदार क्र.१ यांना रुपये ५,०००/– भाडे येते. अंतराळ येथे जाबदार क्र.१ यांच्या वडीलांच्या नावे जमीन गट क्र.६०२ आहे. सदर जमिनीतून जाबदार हे केळी, भाजीपाला, द्राक्षे, उस इत्यादी पिके घेतात. तसेच जाबदारांच्या २ म्हैशी, १ देशी गाय व ५ शेळया आहेत. या सर्व बाबीपासून जाबदार यांना रुपये ५ ते ६ लाख उत्पन्न मिळते. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांची पोटगी देण्याची ऐपत आहे.

**२२.** अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान, जाबदार क्र.१ हे हॉटेलमध्ये वेटरचे काम करत असून त्यांना मिळत असणाऱ्या पैशामध्ये घरखर्च भागत नसल्याचे कबूल केलेले आहे. साक्षीदाराने हे देखील कबूल केले की, त्या मुंबई येथे मेस चालवित होत्या व त्यांच्याकडे १५ डबे होते, सर्वांचे मिळून जवळपास रुपये ४५,०००/– मिळत होते. पुढे त्यांनी हे कबूल केले आहे की, अर्जदार यांना मिळत असलेल्या खानावळीच्या पैशामध्ये ते घर चालवित असल्यामुळे जाबदार हे घरखर्चासाठी पैसे देत नव्हते. अर्जदार यांच्या वडीलांचे अंतराळ गावी ९ खणाचे घर असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्यांच्या वडीलांच्या मृत्युनंतर त्यांची साडे चार एकर जमीन आपल्याच ताब्यात असल्याचे व त्यामध्ये भुईमूग व मक्याची लागवड केल्याचे आणि त्यापासून ४० ते ४५ हजार उत्पन्न मिळत असल्याचे मान्य केलेले आहे. त्याचबरोबर अर्जदार रहात असलेल्या घराचे भाडे रुपये ५,०००/– त्या स्वतः

भरत असल्याचे कबूल केलेले आहे. एकंदरीत जाबदारतर्फे वकीलांनी उपरोक्त उलटतपासातून अर्जदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून त्या स्वतःची व अर्जदार क्र.२ ते ४ यांची उपजिविका करणेस समर्थ असून जाबदार क्र.१ यांची आर्थिक परिस्थती बिकट असून त्यांची पोटगी देण्याची ऐपत नाही असे दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२३. जाबदार क्र.१ यांना मिळणाऱ्या उत्पन्नाबाबत अर्जदार यांनी अभिलेखावर कोणताही ठोस असा पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदारतर्फे जाबदार क्र.१ यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या शेत जमिनीची ८–अ व सातबारा उतारे अर्जदार यांनी दाखल केलेली आहेत. सदर उताऱ्यावरुन जाबदार क्र.१ यांच्या वडीलांच्या नावे मौजे अंतराळ, ता. जत येथे शेत जमीन असल्याचे व त्यातून ते बाजरी व द्राक्षे इत्यादी पिके घेत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी मालमत्ता व दायित्व बाबतचे शपथपत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये जाबदार क्र.१ यांचा हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स झाला असून त्यांना मासिक रुपये २५,०००/– वेतन मिळत असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच जाबदार यांना ज्वारी, बाजरी, केळी व भुईमूम याद्वारे तसेच पशुपालनाद्वारे उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते. भारतीय संस्कृतीनुसार आपल्या पत्नीस सांभाळण्याची जबाबदारी ही तिच्या पतीची असते. अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचे पती–पत्नीचे नाते अदयाप अस्तित्वात आहे. तसेच उभयतांना दोन मुले व एक मुलगी आहे ही बाब देखील विवादीत नाही. त्यामुळे, जाबदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ ते ४ यांना पोटगी देणेस पात्र ठरतात.

२४. पोटगीची रक्कम ठरविताना ही अशा रितीने ठरविणे आवश्यक आहे की, पोटगी रक्कम मिळणा–याला विलासी जिवन जगण्यास प्रतिबंध करेल, परंतु त्याचवेळेस

तिच्या अन्न वस्त्रांचे हाल होवु नयेत व तिचा उदरनिर्वाह होईल. जाबदारतर्फे वकीलांनी नि.२४ सोबत विविधी आठ–अ व सातबारा उतारे दाखल केलेले आहेत. सदर उताऱ्यावरुन अर्जदार क्र.१ व त्यांच्या आईच्या नावे अंतराळ, ता. जत येथे अनेक शेत जमीनी असून त्यापासून त्यांना उत्पन्न मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, अभीलेखावरील उपलब्ध पुरावा, अर्जदार क्र.२ ते ४ यांचा शैक्षणिक खर्च, अर्जदार व जाबदार यांचे राहणीमान, जाबदार वरील अवलंबुन असणारी त्यांचे कुटुंब, जाबदाराचे उत्पन्नाचे साधन व जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती या सर्व बाबींचा विचार करुन मला असे वाटते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार क्र.१ ते ४ यांना प्रत्येकी रु.१,०००/– (रु.एक हजार मात्र) अशी एकूण रुपये ४,०००/– प्रति महिना उदर्निवाहाकरीता पोटगी म्हणुन जाबदार क्र.१ यांच्याकडुन देण्याचा आदेश करणे न्यायोचित राहील. जाबदार क्र.१ यांनी अर्जदाराला प्रस्तुतची केस दाखल होण्यापुर्वी अथवा झाल्यानंतर कुठलिही रक्कम अथवा पोटगी उदरर्निवाहाकरीता दिली याबाबत कुठलाही पुरावा दिलेला नाही. जाबदाराने अर्जदाराची उपेक्षा केल्याने त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करावा लागला. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यापासुन म्हणजे दिनांक २२.०२.२०२१ पासुन देणे न्यायोचीत होईल. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता – ( वैदयकीय व तद्नुषंगीक खर्चाबाबत )</u>**

**२५.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने त्यांना वैदयकीय खर्चापोटी रुपये ३०,०००/– मिळणेची विनंती केली आहे. नि.६ कडील अर्जदार क्र.१ यांचे संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार यांच्या मुलाच्या शस्त्रक्रियेकरिता रुपये ४०,०००/– खर्च झाल्याचे नमूद करणेत आलेले आहे. तथापी, सदर शस्त्रक्रियेच्या अनुषंगाने कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर दाखल करणेत आलेली नाहीत. त्यामुळे, अर्जदार क्र.१ यांची सदरची मागणी मान्य करता येणार नाही.

सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता – ( संरक्षण आदेश )</u>**

**२६.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने जाबदार यांच्या विरूध्द त्यांनी हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करून नयेत असा संरक्षण आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. वरील मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षानुसार प्रथमदर्शनी जाबदारांनी अर्जदार यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे निदर्शनास येते. अर्जदाराने त्यांना होत असलेल्या शारीरीक, मानसीक व शाब्दीक छळाबाबत कथन केले आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार यांना कौ.हि.म.सं.कायदा कलम १८ नुसार संरक्षण आदेश देणे न्यायोचीत हाईल. सबब मी मुद्दा क्र.४ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ (निवासी आदेश अथवा घरभाडे )</u>**

**२७.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने कौ.हि.म.सं.कायदा कलम १९ अन्वये घराचा ताबा अथवा र.रु.३०००/– दरमहा घरभाडे देण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी जाबदार क्र.१ यांच्या नावे घर असुन सदर घरामध्ये अर्जदार यांना स्वतंत्र राहता येईल का याबाबत अर्जदार यांनी कुठलाही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. तसेच अर्जदार यांचे वडीलांचे स्वतःचे घर व शेती असलेबाबत अर्जदार यांनी स्वतः तसेच त्यांचेतर्फे साक्षीदार आक्काताई यांनी पुराव्यादरम्यान मान्य केलेले आहे. त्यामुळे, याठिकाणी अर्जदार या निवासी आदेश अथवा घरभाडे आदेश मिळण्यास पात्र ठरत नाहीत. सबब मी मुद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दे क्र.६ करीता (मुलांचा ताबा मिळणेबाबत)</u>**

**२८.** अर्जदार क्र.१ यांच्या कथनानुसार ती अर्जदार क्र.२ ते ४ यांच्यासह जत येथे रहात आहे. त्यांच्या पालनपोषणाची, कपडेलत्त्याची सर्व व्यवस्था अर्जदार क्र.१

याच करत आहेत. तसेच अर्जदार क्र.२ ते ४ यांच्या शिक्षणाचा खर्च देखील अर्जदार क्र.१ याच पहात आहेत. वर चर्चिल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ४ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/- प्रमाणे अशी एकूण रक्कम रुपये ४,०००/- पोटगी मंजूर करणेत आलेली आहे. त्यामुळे, अर्जदार क्र.२ ते ४ यांचा ताबा अर्जदार क्र.१ यांचेकडेच ठेवणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.६ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

## मुद्दे क्र.७ करीता

**२९.** जाबदार क्र.१ व २ तर्फे विधीज्ञांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये अर्जदार यांनी मान्य केले आहे की, त्यांचे लग्नाचे वेळी वय १६ वर्षे होते. त्यांनी त्यांचे वय जास्त दाखवून जाबदार क्र.१ यांचेसोबत लग्न करुन त्यांची फसवणूक केल्याचा सुचनार्थी प्रश्न त्यांनी अमान्य केलेला आहे. जाबदार क्र.१ व जाबदार क्र.३ यांनी अर्जदार यांच्या आईच्या घरी येवून अर्जदार यांना मारहाण केल्यामुळे त्यांनी प्रस्तूत प्रकरणात जाबदार क्र.३ म्हणून सामील केले असल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार या त्यांच्या लग्नाच्या वेळी अज्ञान होत्या व त्यांनी जाबदार क्र.१ यांना फसवून त्यांच्याशी बाल विवाह केला ही बाब देखील अभिलेखावर आणणेचा प्रयत्न जाबदार यांच्या वकीलांनी केला आहे. परंतु, जाबदार यांनी सदरचा आक्षेप त्यावेळेसच घेणे अपेक्षित होते. तशी जाबदार यांना कायदयाने स्वतंत्र मुभा होती. तथापी, अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचे लग्न होवून जवळपास १५ ते १६ वर्षे झालेली आहेत. सदयस्थितीला त्या मुद्दयावर काही भाष्य करणे योग्य होणार नाही.

**३०.** प्रस्तुत कामातील अर्जदार क्र.२ ते ४ हे अज्ञान आहेत. तथापी, त्यांचे अ.पा.क. नेमणुकीकरिता स्वतंत्र अर्ज व प्रतिज्ञापत्र या कामी सादर करण्यात आलेले नाही याही कारणास्तव अर्ज फेटाळणेची विनंती जाबदारांनी केली आहे. तथापी, सदरचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत दाखल

करणेत आलेला आहे. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ चा सांभाळ व शिक्षण तसेच काळजी घेत आहे. अशा परिस्थितीत अर्जदार क्र.२ ते ४ तर्फे तिला सदर अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे, अर्जदार क्र.२ ते ४ यांचे अज्ञान पालक म्हणून अर्जदार क्र.१ ने या न्यायालयाची परवानगी घेण्याची गरज नाही. वरील सर्व चर्चेअंती अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजुरीस पात्र ठरतो. करिता, मी मुद्दा क्र.७ चे उत्तरात खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो

२. जाबदार क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र.१ ते ४ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) अशी एकूण रक्कम रुपये ४,०००/- दरमहा पोटगी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन म्हणजेच दिनांक २२.०२.२०२१ पासुन दयावी.

३. सर्व जाबदार यांना असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही अर्जदार यांचा कुठल्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करू नये.

४. अर्जदार क्र.२ ते ४ यांचा ताबा अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्याकडेच ठेवणेचा आहे.

५. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार व जाबदारांना कौंटुबिक हिंसाचारापासुन महिंलाचे संरक्षण कायदा कलम २४ प्रमाणे मोफत देण्यात यावी. जाबदारांची प्रत नोंदणीकृत डाकेने त्यांच्या पत्त्यावर पाठविण्यात यावी.

६. न्यायनिर्णयाची प्रत्येकी एक प्रत संरक्षण अधिकारी व संबधीत पोलिस स्टेशन यांना पाठवावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).**

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.07.17 17:38:25 +0530

**दिनांकः–१७.०७.२०२६** **(प्रकाश चु. बछले)**

**जत.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R.B. Samalewale, Stenographer-Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C., Jath. |
| Date. | : | 17.07.2026 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 17.07.2026 |
| Order uploaded on. | : | 17.07.2026 |